# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 31.12.2012 (का.प.क्र.21) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त,**

**सोमवार दिनांक 31.12.2012 (का.प.क्र.21) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.35 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

**01.** स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
**02.** स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
**03.** स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
**04.** स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
**05.** स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
**06.** स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
**07.** स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
**08.** स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
**09.** स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
**10.** स. श्री.खान अक्रम करीम खान
**11.** स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
**12.** स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
**13.** स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

**श्री.रेणुकादास वैद्य** :दिल्ली येथील घटनेत पिडीत मुलीचा बळी गेलेला आहे. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर झालेल्या अपघातामध्ये आनंद अभ्यंकर आणि अक्षय पेंडसे यांचा दुर्देवी मृत्यु झालेला आहे. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :अनुमोदन आहे.

(सभागृहाच्या वतीने 2 मिनीट शांत उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात येते. )

**श्री.रेणुकादास वैद्य** :स.सदस्य श्री.समीर राजुरकर यांचा वाढदिवस असल्याने सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

**मा.सभापती** :सभागृहाच्या वतीने स.सदस्य श्री.समीर राजुरकर यांना सभागृहातर्फे वाढदिवसाच्या सुभेच्छा देण्यात येतात.

**मा.सभापती** :महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त म्हणुन श्रीमती केसरकर रूजु झालेल्या आहेत त्यांनी आपला परिचय सभागृहास देण्यात यावा.

**श्रीमती प्रियंका केसरकर (सहा.आयुक्त):** यापुर्वी पालघर येथे मुख्याधिकारी म्हणुन काम केलेले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त म्हणुन रूजु

झालेली आहे .

श्री.बाळासाहेब मुंडे :मागील बैठकीत टँकरबाबत चर्चा झाली होती परंतु माझ्या वार्डात एकही टँकर सुरू झालेले नाही. टँकरसाठी प्रशासनाकडे अर्ज आलेले आहे. 1 तारखेला पाणीपुरवठा समांतरकडे हस्तांतर होत आहे. अशा परिस्थितीत त्यांचेकडे टँकर व्यवस्था आहे का? पिण्यासाठी नागरीकांना पाणी नाही. दुष्काळाची परिस्थिती आहे. यावर्षी सर्वांत जास्त टँकर लागणार आहे. नागरीकांना टँकरद्वारा पिण्याची पाण्याची कशी व्यवस्था करणार आहे. ज्या भागामध्ये बोअर नाही. त्याभागामध्ये पिण्यासाठी पाणी कसे देणार आहे. समांतरकडे हस्तांतरण झाल्यावर नागरीकांना टँकरद्वारा पाणी कसे देणार आहे. 1 तारखेपर्यंत नागरीकांना थांबण्यास सांगीतले होते. कृपा करून नागरीकांशी जीवाशी खेळु नये. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :कशा पध्दतीने नियोजन करणार आहे. खुलासा करण्यात यावा.

श्री.गिरजाराम हळनोर :नविन वर्षात पाणीपुरवठा समांतरकडे जात आहे. नविन वर्षात चांगल्या प्रकल्पाला सुरवात होत आहे. पाणीपुरवठा संदर्भात वार्डामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास नगरसेवक वार्ड इंजिनिअरला, लाईनमन, दुय्यम आवेक्षक यांना संपर्क करतात परंतु आता बदललेल्या परिस्थितीमध्ये कुणाशी संपर्क करायचा समांतरचा कोणता अधिकारी कोणत्या वार्डात नियुक्त केलेला आहे हया सर्वांचे कॉन्टॅक्ट नंबर सर्व स.सदस्यांना मिळाल्यास ते योग्य होईल.

कार्यकारी अभियंता (पा/पु) :समांतर जलवाहिनी कशा पध्दतीने ॲक्टीव्हेट होणार आहे याबाबत नागरीकांना माहिती देण्यात आलेली आहे. टँक्टरची सध्याची जी परिस्थती आहे ती तशीच चालू राहणार आहे. टँकराबाबत पुर्वीचीच पध्दत तशीच चालू राहणार आहे. त्यात कोणताही बदल करण्यात येणार नाही. मानवतेच्या दृष्टीने पाणी सर्वांना द्यावेच लागेल परंतु एक मुद्दा नमुद करू इच्छितो की, शहरात अनाधिकृत वस्त्या मोठया प्रमाणात निर्माण होत आहे. त्यामुळे या सर्वांचा ताण टँकर सिस्टीमवर पडत आहे. टँकरचा खर्च आणि टँकरपोटी होणारी पाणपट्टी यात कमालीची विसंगती आहे. यादृष्टीने प्रशासनाला कृपया मार्गदर्शन करण्यात यावे. टँकर मागणी बाबतचे प्रलंबित अर्ज लवकरात लवकर निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल. साधारणपणे सहा महिने पुर्ण सिस्टिम कार्यान्वित होईपर्यंत प्रशासन त्यांना पुर्णपणे मदत करणार आहे. वार्डातील इंजिनिअरकडे पाण्याबाबत तक्रारी दाखल करू शकतात तसेच कन्सेशनर्सने जवळपास 150 इंजिनिअर कर्मचाऱ्यांची नेमणुक केलेली आहे. कोणकोणत्या भागात केलेली आहे. देखभाल दुरूस्तीचे कंत्राटदार यांचे मोबाईल क्रमांक सर्व स.सदस्यांना देणार आहे. जेणेकरून सदस्यांना अडचणी येणार नाही. तसेच प्रशासनामार्फत नागरीकांसाठी 24 तास कॉलसेंटर चालू राहणार आहे. त्याचा नंबरही देण्यात येणार आहे.

श्री.समीर राजुरकर :गुंठेवारी भागात टँकरच्या मागणीसाठी आलेले अर्जाचे क्लोजिंग

करणे शक्य नाही. गुंठेवारी भागासाठी प्रशासनाचा व समांतर यांचा काही ॲक्शन प्लॅन तयार आहे का? वार्डात लिकेजेस झाल्यास त्याची दुरूस्ती कुणी करायची? समांतरची प्लॅनिंग व्यवस्थीत झाली नाही तर सुरू होण्यापुर्वीच प्रोजेक्ट फेल होईल. लिकेजेस् सप्लाय टायमिंग याबाबतचे सविस्तर विवेचन स.सदस्यांना होणे आवश्यक आहे. तसेच कॉलसेंटरवरील दुरध्वनी 24 तास चालु राहिल याची दक्षता घेण्यात यावी. पाणीप्रश्नासाठी मराठवाडयातील लोकप्रतिनिधी गंभिर आहे. यासाठी महानगरपालिकेने पाणी वाचविण्यासाठी नागरीकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी 1 ते 30 तारखेपर्यंत जनजागृती केली पाहिजे.

**श्री.नारायण कुचे** :गुंठेवारीच्या एकुण 117 वसाहती आहेत. बीड हायवे आणि रेल्वेरूळाच्या पलिकडचा भाग हा वाढलेला आहे परंतु मुंकूदवाडी, जयभवानी नगर हा भाग सुमारे 20 वर्ष जुना आहे. त्या ठिकाणी पाणी देणे आवश्यक आहे. सदरील भागात पुर्वी पाऊस चांगल्या प्रमाणात झाल्यावर नागरीकांना बोअरवर अवलंबुन राहता येत होते परंतु हया वर्षी पावसाळा अत्यंत कमी झाल्या असल्याने बोअरलाही पाणी आलेले नाही. वार्डामध्ये अतिशय गंभिर परिस्थीती निर्माण झालेली आहे. पाण्याची मागणी वाढलेली आहे.

**मा.सभापती** :पाणीपुरवठा टँकरद्वारा अजुन किती दिवस चालू राहणार आहे.पाणीपुरवठा योजना हस्तांतरीत करत आहे.

**कार्यकारी अभियंता (पा/पू)** :1289 कि.मी.पाईप नविन लाईन टाकणार आहे. त्यात रेग्युलाईज झालेल्या गुंठेवारी, नविन ले आऊट या ठिकाणी पाईप लाईन टाकण्यात येणार आहे. प्रयत्न असा राहणार आहे की, टँकर पुर्णत:बंद बंद झाले पाहिजे पाईपद्वारे पाणीपुरवठा झाला पाहिजे. एक ते दिड वर्षामध्ये कार्यान्वित होणार आहे. टँकरचा लोड महानगरपालिकेवर राहणार आहे. टँकरचा पुरवठा समांतर कंत्राटदारच करणार आहे.

**मा.सभापती** :खर्च कोण करणार आहे.

**कार्यकारी अभियंता (पा/पू)** :टँकरचा खर्च समांतर कत्राटदारच उचलणार आहे. रिव्हेन्यु त्यांचेकडेच जमा होणार आहे. नविन 100 ट्रिप वाढल्यास प्रश्न उद्‌भवु शकतो. 20 बाय 30 च्या अनाधिकृत वस्त्यांना बंधन घातले पाहिजे. मार्च एप्रिल 2012 मध्ये 37 टँकर कार्यरत होते. चालु वर्षी टँकरची संख्या वाढली आहे सध्या 39 टँकर चालू आहे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :गुंठेवारी विभागास पिण्याचे पाणी देण्यात यावे.

**मा.सभापती** :आर्थीक बोजा महानगरपालिकेवर पडता कामा नये समांतरच्या माध्यमातुन प्रश्न सोडविण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता (पा/पू)** :भविष्यात कमीत कमी टँकर होवुन पाणी पाईपद्वारे मिळण्याचे नियोजन आहे.

**श्री.विजेंद्र जाधव** :प्रकल्प विभागात कार्यरत सात कर्मचाऱ्यांना मागील बैठकीत रुजु करून घ्यावे म्हणुन आदेशित केले होते. खुलासा करण्यात यावा.

**प्रकल्प अधिकारी (सुजंयो)** :प्रकल्प विभागाकडुन संचिका पुटअप झालेली आहे. आस्थापना

विभागाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेली आहे.

**मा.सभापती** :संचिका मागवुन तात्काळ निर्णय देण्यात यावा. संत एकनाथ आणि सिडको नाटयगृह येथील शोचे डिपॉझिट वन टाईम घेणेबाबत खुलासा करण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी** :एक रकमी डिपॉझिट घेण्याचा जो मुद्दा होता प्रस्ताव होता तो मंजूरीअंतर्गत आहे. संत तुकाराम नाटयगृहाचे खाजगीकरण करण्यासंदर्भात जाहिरात काढलेली आहे.

**श्री.समीर राजुरकर** :एक रकमी डिपॉझिटचा विषय गेल्या सहा महिण्यांपासून स्थायी समितीमध्ये चर्चेत आहे. प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही हे योग्य नाही. आऊटसोर्सिंग दोन्ही नाटयगृहाचे करण्यात यावे. दोन वेगवेगळे विषय वेगवेगळया पध्दतीने हॅन्डल करण्यात येवु नये.

**मालमत्ता अधिकारी** :संत तुकाराम नाटयगृहाचे खाजगीकरणाचा प्रस्ताव तयार केलेला आहे.

**श्री.समीर राजुरकर** :सदरील नाटयगृह घेण्यात कुणाचा इन्टरेस्ट आहे का? म्हणुन त्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे.

**मा.सभापती** :दोन्ही नाटयगृहाचे खाजगीकरण का करण्यात येत नाही. एकाच नाटयगृहाचे का? करण्यात येते.

**श्री.समीर राजुरकर** :एकाच नाटयगृहाचे खाजगीकरण करण्यात येवु नये. दोन्ही नाटयगृहाचे खाजगीकरण करण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :मा.सर्वसाधारण सभेने संत एकनाथ रंगमंदिराचा खाजगीकरणाचा प्रस्ताव संत तुकाराम नाटयगृहाच्या पहिले झ ाालेला आहे. कारण काय आहे की, संत तुकाराम नाटयगृहाचे खाजगीकरण करण्यात येत आहे पण संत एकनाथ रंगमंदिराचे काम करण्यात येते. खाजगीकरणाबाबत महानगरपालिकेची निश्चित पॉलिसी ठरली पाहिजे. एकाला एक न्याय दुसऱ्यारा दुसरा न्याय हे कशासाठी?

**मालमत्ता अधिकारी** :संत एकनाथसाठी यापुर्वी एक निवीदा काढण्यात आली होती. परंतु कुणी निवीदा भरली नाही.

**मा.सभापती** :कमिटी स्थापन करून निर्णय घेण्यात यावा. खाजगीकरणावर दिल्यास त्या वास्तुंची देखभाल दुरूस्ती योग्य पध्दतीने होईल. दोन्ही नाटयगृहाचे खाजगीकरण करण्यात यावे. नसता दोन्ही नाटयगृहाचे खाजगीकरण करण्यात येवु नये.

लॉटरी व्यवसायावर एलबीटी आकारणी करणे बाबत खुलासा करण्यात यावा.

**एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी)** :लॉटरी व्यवसायावर एलबीटी आकारणी करणे बाबत शहरात नोटीस इश्यु केलेली आहे. 15 दिवसांची मुदत मागण्यात आलेली आहे. कंपनीने अपील केलेले आहे त्यांची सुनावणी घेवुन निर्णय घ्यावयाचा आहे.

**मा.सभापती** :याबाबत प्रशासनाने तांत्रिकबाबीची संपुर्ण माहिती घेवुन एलबीटी आकरण्याबाबतची पुर्व तयारी करण्यात यावी.

**श्री.नारायण कुचे** :प्रोझोन मॉलचा येथील रोड विकासाठी प्रोझोन मॉल यांनी घेतला

होता. रस्त्याचे काम काही बाकी आहे. उर्वरित रस्त्यांचे काम का करण्यात आले नाही.

**उपअभियंता (श्री.अफसर सिद्दीकी)** :प्रोझोन मॉलने अर्ध्या कि.मी.चे काम केलेले आहे. वरच्या टप्प्यावरचे व्हायबलिटी कदाचित सुट होणार नाही म्हणुन काम सुरू झालेले नाही.

**श्री.नारायण कुचे** :किती कर लावण्यात आलेला आहे.

**कार्यकारी अभियंता (पा/पू)** :5.50 मि.चा पुर्ण झालेला आहे. साडेपाच कोटी रूपये खर्च आलेला असुन प्रॉपर्टी टॅक्स एक कोटी दहा लाख तसेच ड्रिनेजचा टॅक्स मिळुन दिड कोटीच्या आसपास टॅक्स लावण्यात आलेला आहे. पुढील आर्थिक वर्षामध्ये नियमीत टॅक्स सुरू होईल. मा.सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला आहे की, मनपाची आर्थिक स्थित बरोबर नसल्याने बिल्डर काम करण्यास समोरे येत असतील तर त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे. त्यानुसार प्रोझोन मॉलने 1.1 कि.मी.चा रस्ता तयार करण्यासंदर्भात त्यांचेकडुन प्रस्ताव घेण्यात आला. मा.सर्वसाधारण सभा आणि स्थायी समिती सभा यांची मंजरी घेण्यात आली आणि त्यानुसार रस्त्याचे काम करण्यात आले. 1.1 रस्ता तयार करण्यासाठी 10 ते 12 कोटी रूपये लागणार होते. प्रोझॉन मॉलचा प्रॉपर्टी टॅक्स मीसमॅचिंग होत होते. त्यामुळे 5.50 मीटरवर काम थांबविण्यात आले. प्रॉझॉन मॉलने जे काम केलेले आहे. ते स्वत:पुरतेच केलेले आहे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :गेल्या दोन महीण्यांपासून जेटींग मशिन नाही.

**उपअभियंता (यांत्रिकी)** :जेटींग मशिन दुरूस्तीसाठी टेंडर काढलेले आहे. पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. वार्ड ब व फ येथील आवश्यकतेनुसार जेटींग मशिन पुरविण्यात येते. स्वतंत्र वाहनचालक पुरविण्यात येईल जेणे करून प्रश्न थोडयाफार प्रमाणात मिटेल.

**मा.सभापती** :सेकंडशिफमध्ये ड्रायव्हरला पाठविण्यात यावे.

**श्री.नारायण कुचे** :रिझवान कर्मचारी यांना वार्ड ब मध्ये देण्यात आलेले आहे. त्यांना वार्ड इ कार्यालयात देण्यात यावे.

**श्री.मोहन मेघावाले** :सदरील कर्मचारी यांना वार्ड ब मध्येच ठेवण्यात यावे पर्यायी कर्मचारी वार्ड इ कार्यालयात देण्यात यावी.

**मा.सभापती** :मुख्य लेखापरिक्षक श्री.थत्ते यांची दिनांक 26.12.2012 ते 05.01.2013 पर्यंत रजा मिळण्यासंबधी स्थायी समितीला परवानगी मागीतलेली आहे. मुख्य लेखापरिक्षक श्री.थत्ते यांची रजा मंजूर करण्यात येते त्यांना सुट्टीवर जाण्याची परवानगी देण्यात येते.

**मा.सभापती** :

**<u>विषय क्र. 109 :</u>** (विषय क्र. 97 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 15/12/2012 (दि.29/11/2012 का.प.क्र.19 ची तहकुब सभा) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** : विषय क्रमांक 109 स्थगीत.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 110 : (विषय क्र. 98 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 15/12/2012 (दि.29/11/2012 का.प.क्र.19 ची तहकुब सभा) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

मा.सभापती : विषय क्रमांक 110 स्थगीत.

ठराव :

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 111 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.गारखेडा येथील नुपुर अपार्टमेंट लगत/शेजारील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील व्यापारी संकुलामधील दुकान क्र.2 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.ॲड. राजेंद्र पी. मुगदीया यांनी केलेल्या मागणी व विनंतीनुसार दुकान संबंधीतास देणेबाबत मान्यता झाली आहे. सदर दुकान निविदा पध्दतीने देण्याच्या कार्यवाहीत निविदाधारकाने दरमहा रू.2117/- चा दर भरला होता. मान्यता झालेनंतर भाडे भरणा करून जागा ताब्यात न घेतल्याने सदर दुकान रद्द करण्यात आली व सध्या सदर दुकान रिक्त आहे. करीता संबंधीताची मागणी व विनंती संबंधाने सदर दुकानाकरीता आर.आर. ने होणाऱ्या भाडे दराच्या दिडपट भाडेदराने म्हणजे रक्कम रू.3000/- प्रतिमाह भाडे आकारून इतर नेहमीच्या अटी / शर्तीस अधीन राहून प्रथम तीन वर्षाचे कालावधी करीता अर्जदार श्री. ॲड. राजेंद्र पी. मुगदिया यांना भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.3000/- प्रति माह निश्चित करून नेहमी इतर अटी / शर्तीस अधिन राहुन प्रथम तीन वर्षाचे कालावधी करीता दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 111 विषय मंजूर.

मालमत्ता अधिकारी :महानगरपालिकेच्या ताब्यातील व्यापारी संकुल नुपूर अपार्टमेंटच्या बाजुला दुकान नंबर 2 श्री.राजेंद्र मुगदिया यांनी भाडेपट्टयावर देण्याची मागणी केलेली आहे. ते त्यांना दिलेले आहे.

मा.सभापती : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.गारखेडा येथील नुपुर अपार्टमेंट लगत/शेजारील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील व्यापारी संकुलामधील दुकान क्र.2 अर्जदार श्री.ॲड. राजेंद्र पी. मुगदीया यांना रक्कम रू.3000/- प्रतिमाह भाडे आकारून इतर नेहमीच्या अटी / शर्तीस अधीन राहून प्रथम तीन वर्षाचे कालावधी करीता दुकान भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 112 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.संजय कचरू पवार यांची शैक्षणिक अर्हता B.A. (English, History and Sociology) असतांना त्यांना लेखाधिकारी पदावर चुकीच्या पध्दतीने पदोन्नती दिल्याचे त्यांच्या सेवालेखा अभिलेखावरून दिसून आल्यामूळे त्यानुषंगाने चौकशी करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2012/167 दिनांक 01/02/2012 पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली होती.

सदर प्रकरणी समितीने जा.क्र.मनपा/उआ(म)/स्वीस/2012/50, दिनांक 29/08/2012 अन्वये चौकशी अहवाल सादर केला. त्यानुसार दिनांक 21/09/1996 रोजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या कर्मचारी निवड

समितीने श्री.संजय कचरू पवार हे त्यावेळी वरीष्ठ लेखा परिक्षक या पदाच्या धारण करीत असलेल्या शैक्षणिक अर्हतेचा विचार करून ते 'लेखाधिकारी' या पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत असे दाखवुन तसेच 'लेखाधिकारी' या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता म्हणजेच वाणिज्य शाखेचा स्नातक/एस.ए.एस. किंवा महाराष्ट्र अर्थ व लेखा सेवा यासह कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक ही अर्हता धारण करीत नसतांना त्यांना 'लेखाधिकारी' या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे, असा निष्कर्ष नोंदविलेला आहे.

उक्त प्रमाणे प्राप्त अहवालावर कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी अभियंता (वार्ड ब/क) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2012/1151 दिनांक 18/09/2012 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 54 (1) नुसार चार सदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार लेखाधिकारी पदासाठी सेवाभरती नियमात नियुक्तीची पध्दत दर्शविण्यात आली आहे. त्यात थेट भरतीने लेखाधिकारी पद भरणे बाबत तरतुद नाही. त्यामुळे मनपा सेवाभरती नियम 1994 मधील लेखाधिकारी या पदासाठीच्या नियुक्तीची पध्दत अ.क्र.10 मधील (ब) मध्ये नमुद पध्दतीने (पदोन्नतीने) पद भरावयाचे असले तरी त्या पदाकरीता सेवाभरती नियमातील नमुद अर्हता धारण करणे अनिवार्य ठरते. तथापी या प्रकारची अर्हता पदोन्नतीच्या वेळी श्री.संजय कचरू पवार हे धारण करीत नव्हते.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक क्र.सीडीआर-1164-डी, सचिवालय, मुंबई-32 दिनांक 12/08/1964 अन्वये एखादा कर्मचारी तो ज्या पदावर कार्यरत आहे, त्या पदापेक्षा वरीष्ठ पदावर पदोन्नती देण्यास पात्र नसतांना देखील त्यास जर पदोन्नती दिल्या गेली असेल तर 'अपात्रतेच्या' कारणावरून त्यास ज्या पदावर पदोन्नती दिल्या गेली त्या पदावरून खालच्या पदावर आणता येईल, अशी तरतुद आहे. शासन निर्णय Govt-CORR-FR-No. PAY-1063/6343/48/V Date 19/04/1965 नुसार एखाद्या पदावर पदोन्नती दिल्यानंतर ती चुकीची आहे किंवा नाही तसेच पदावनती बाबतचा निर्णय पदोन्नती देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या वरीष्ठ प्राधिकाऱ्यांकडुन होणे आवश्यक आहे. दि.29/08/2012 व दि.03/11/2012 रोजी अनुक्रमे दोन्ही चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार श्री.संजय कचरू पवार हे लेखाधिकारी या पदाची शैक्षणिक अर्हता पदोन्नतीच्या वेळी धारण करीत नव्हते. त्यामुळे त्यांना दिलेली पदोन्नती चुकीच्या पध्दतीने दिलेली आहे हे सिध्द होते. त्यानुसार श्री.संजय कचरू पवार यांना लेखाधिकारी पदावरून पदावनत करता येईल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (3) नुसार आयुक्त, महानगरपालिका यांनी पदोन्नती दिली होती. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (4) च्या परंतुकान्वये मा.स्थायी समिती ही महापालिका आयुक्तांची निकट वरीष्ठ प्राधिकारी आहे. त्यामुळे श्री.संजय कचरू पवार, लेखाधिकारी यांना 'लेखाधिकारी' या पदावरून 'वरीष्ठ लेखा परिक्षक' या पदावर पदावनत करणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

श्री.बाळुलाल गुजर : विषय स्थगित करण्यात यावा. 18 वर्षानंतर सदरील विषय का घेण्यात आला? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा. सदरील विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.बाळुलाल गुजर : 18 वर्षानंतर सदरील मुद्दा का उचलण्यात आला?

श्री.शेख अब्दुल असद : विषय मंजूर करण्यात यावा.

श्री.बाळुलाल गुजर : विषय मंजूर करण्यात यावा, परंतु खुलासा करण्यात यावा.

आस्थापना अधिकारी-1: दिनांक 21.09.1996 रोजी लेखाधिकारी पद भरण्यासाठी कमिटी गठीत करण्यात आली होती. सदर कमिटीने पद भरतांना अर्हता दाखविलेली आहे. कुठल्याही विद्या शाखेचा स्नातक असणे आवश्यक आहे, अशी पात्रता दाखविलेली आहे. वास्तविक त्यावेळेस कॉमर्स ग्रॅज्युएट असणे आवश्यक होते. ती अर्हता न दाखविता कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक ही अर्हता दाखविण्यात आलेली आहे आणि पदोन्नती दिलेली आहे. प्रशासनाच्या जेव्हा

ही बाब लक्षात आली त्यावेळेस समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने सदर बाबीचा पुर्ण अभ्यास करून अहवाल दिलेला आहे आणि त्या अहवालानुसार हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री.बाळुलाल गुजर : 18 वर्षानंतर हा प्रस्ताव का आला. 3 वर्षाच्या आत परिक्षा घेणे आवश्यक होते. ती परिक्षा घेतलेली आहे का?**

**आस्थापना अधिकारी-1: कुणाचीच परिक्षा घेतलेली नाही. परिक्षेचा विषय नाही.**

**श्री.बाळुलाल गुजर : वरिष्ठ पदावर गेल्यावर त्यास खालच्या पदावर आणणे याचे कारण काय?**

**आस्थापना अधिकारी-1: अर्हता नाही. पदासाठी जी अर्हता आवश्यक होती ती नाही.**

**श्री.गिरजाराम हळनोर : या प्रस्तावाच्या निमित्ताने एक गोष्ट समोर आलेली आहे. गेल्या 20 वर्षापासून प्रशासन कुठल्या पध्दतीने पदोन्नती देत आहे. कुठल्याही प्रकारच्या विभागीय परिक्षा घेतल्या जात नाही, जे महानगरपालिकेत घेणे आवश्यक होते. त्या घेतलेल्या नाही. प्रशासनाच्या ही बाब उशीरा लक्षात आलेली आहे. शासन निर्णयात त्याचा उल्लेख आहे म्हणुन प्रशासनाने हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवलेला आहे. सगळया सभागृहाची संमती असल्यास हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.**

**मा.सभापती : सदरील विषय कशाच्या आधारे सभागृहापुढे ठेवलेला आहे. नगर सचिव यांनी खुलासा करावा.**

**प्र.नगर सचिव तथा विधी सहाय्यक : विषय क्रमांक 112 प्रामुख्याने यासाठी आलेला आहे की, एखाद्या पदावर पदोन्नती दिल्यानंतर ही चुकीची आहे किंवा नाही. पदोन्नतीबाबतचा निर्णय पदोन्नती देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याकडुन होणे आवश्यक आहे. हा शासन निर्णय दिनांक 19.04.1965 चा आहे आणि या शासन निर्णयाच्या अनुषंगाने हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 56 (4) नुसार ही तरतुद लक्षात घेतल्यास आयुक्तांची वरिष्ठ प्राधिकारी स्थायी समिती आहे. म्हणुन हा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे.**

**मा.सभापती : सदर विषय मंजूर करण्याबाबत स.सदस्यांनी आपले मत सभागृहात व्यक्त करावे.**

**श्री.बाळुलाल गुजर : स्थायी समितीने माझा विरोध नोंदवुन घ्यावा. यास माझा विरोध आहे.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.बाळुलालजी गुजर यांचा विरोध नोंदविण्यात येतो. स.सदस्य श्री.असद पटेल यांनी प्रस्तावावर आपले मत मांडावे.**

**श्री.शेख अब्दुल असद : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.विजेंद्र जाधव यांनी आपले मत मांडावे.**

**श्री.विजेंद्र जाधव : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.अक्रम खान यांनी आपले मत मांडावे.**

**श्री.खान अक्रम करीम खान : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.मुजीबोद्यीन यांनी आपले मत मांडावे.**

**श्री.मो.मुजीबोद्यीन कदीरोद्यीन : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.बाळुलाल गुजर यांनी आपले मत मांडावे.**

**श्री.बाळुलाल गुजर : प्रस्तावास माझा विरोध आहे.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.बाळुलाल गुजर यांचा विरोध नोंदविण्यात यावा. स.सदस्य श्री.मोहन मेघावाले यांनी आपले मत मांडावे.**

**श्री.मोहन मेघावाले : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.राजू वैद्य यांनी आपले मत मांडावे.**

**श्री.रेणुकादास वैद्य : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**

**मा.सभापती : स.सदस्य श्री.गिरजारामजी हाळनोर यांनी आपले मत मांडावे.**

**श्री.गिरजाराम हाळनोर : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**
**मा.सभापती : स.सदस्य श्री.नारायण कुचे यांनी आपले मत मांडावे.**
**श्री.नारायण कुचे : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**
**मा.सभापती : स.सदस्य श्री.बाळासाहेब मुंडे यांनी आपले मत मांडावे.**
**श्री.बाळासाहेब मुंडे : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**
**मा.सभापती : स.सदस्य श्रीमती प्राजक्ता राजपुत यांनी आपले मत मांडावे.**
**सौ.प्राजक्ता राजपुत : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**
**मा.सभापती : स.सदस्य श्रीमती सविता घडमोडे यांनी आपले मत मांडावे.**
**सौ.सविता घडमोडे : प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.**
**मा.सभापती : श्री.बाळुलाल गुजर यांचा विरोध नोंदवुन सभागृहात उपस्थित असलेल्या उर्वरीत सर्व स.सदस्यांच्या सहमतीने विषय क्रमांक 112 मंजूर करण्यात येतो.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.संजय कचरू पवार हे 'लेखाधिकारी' या पदाची शैक्षणिक अर्हता पदोन्नतीच्या वेळी धारण करीत नव्हते तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे त्यांना दिलेली पदोन्नती चुकीच्या पध्दतीने दिलेली असल्यामुळे व उपस्थित स.सदस्यांनी प्रस्ताव मंजुरीबाबत सहमती दर्शविल्याने प्रशासनाने सादर केल्यानुसार श्री.संजय कचरू पवार, लेखाधिकारी यांना 'लेखाधिकारी' या पदावरून 'वरीष्ठ लेखा परिक्षक' या पदावर पदावनत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करावी.**

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 113 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सुवर्ण जयंती पथ असा रस्ता विकसीत करावयाच्या कामाअंतर्गत क्रांती चौक ते इंन्स्टीट्युट ऑफ इंजिनिअर्स (चेलीपुरा हायस्कुल) व पटवर्धन हॉस्पीटल ते रेल्वेस्टेशन या 40 मी. रूंद विकास योजना (लांबी 1630.00 मी.) रस्त्याचे कॉंक्रेटीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम / म.जी.प्रा. खात्याच्या सन 2011 -2012 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.16.42 कोटीचे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभा दि.18/10/2012 रोजी ठराव क्र.965 नुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. याप्रमाणे सदरील कामाकरीता ई-निविदा विभागामार्फत जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 09 निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत - मे.मस्कट कंन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद व मे.जी.एन.आय. इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद अशा एकुण 02 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचे प्रथम लिफाफे (Envelop-A) / Technical Bid उघडण्यात येऊन तांत्रिक कागदपत्रांची Bid Capacity तपासणी करीता छाननी केली असता अनुक्रमे मे.मस्कट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरली व मे.जी.एन.आय. इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांची निविदा यामध्ये पात्र ठरली. यानुसार पात्र निविदा धारकाचे Commercial Bid उघडले असता ते तुलनात्मकदृष्ट्या खालीलप्रमाणे प्राप्त झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| मे.जी.एन.आय. इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.13 % जास्त दराने |

सदर प्राप्त निविदा दर हे अंदाजपत्रकापेक्षा जास्तीचे असल्याने दराबाबत वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त महोदय यांनी समिती गठीत केली व यानुसार संबंधीत गुत्तेदारास दर वाटाघाटीसाठी समिती समोर बोलविण्यात आले. संबंधीत गुत्तेदाराने सदर काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.13% जास्त दराने करण्यास वाटाघाटीअंती समितीस लेखी पत्र दिले. परंतु हे दर जास्त असल्याने समितीने पी.एम.सी. मार्फत सध्याच्या बाजारभावानुसार दरपृथ:करण (Rate Analysis) तयार केले असता, सदर निविदा दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.86% जास्त येतात. त्यानुसार संबधीत गुत्तेदारास समितीने पुन:श्च दर वाटाघाटीसाठी समक्ष बोलावुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.86% जास्त दराने काम करण्याबाबत विचारणा केली असता संबंधीत गुत्तेदार यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.86% जास्त दराने करण्यास लेखी संमती दिली आहे. त्यानुसार मा.आयुक्त महोदय यांनी यास मान्यता देऊन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.86% जास्त दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करणेची शिफारस केली आहे.

करीता नमुद काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.86% जास्त दराने मे. जी.एन.आय. इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून करून घेणेच्या निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 113 मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सुवर्ण जयंती पथ असा रस्ता विकसीत करावयाच्या कामाअंतर्गत क्रांती चौक ते इंन्स्टीट्युट ऑफ इंजिनिअर्स (चेलीपुरा हायस्कुल) व पटवर्धन हॉस्पीटल ते रेल्वेस्टेशन या 40 मी. रूंद विकास योजना (लांबी 1630.00 मी.) रस्त्याचे कॉंक्रेटीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त निविदांपैकी तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारक मे.जी.एन.आय. इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती

**ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.86% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 114 :**

**प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील भोलेश्वर मार्केट व्यापारी संकुल येथील दुकान क्र.20 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.विष्णु कांतीलाल क्षिरसागर यांनी विनंती केल्यानुसार प्रशासकीय मान्यता होऊन सदर दुकान संबंधीतास भाडे तत्वावर देणे प्रस्तावित आहे. सदरील दुकानाचे क्षेत्रफळ 6.30 चौ.मी. एवढे असून महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार सदर दुकान गाळयाचे भाडे या वर्षीचे शिघ्र सिध्द गणकानुसार होणाऱ्या प्रति दुकान प्रति वर्ष रू.23960/- याप्रमाणे भाडे होत आहे. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता संबधीताचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.23960/- प्रति वर्ष निश्चित करून प्रथम तीन वर्षाचे कालावधीकरीता दुकानाचे नेहमी इतर अटी/शर्तीस अधीन राहुन दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.**

**श्री.रेणुकादास वैद्य : एवढ्या मोठ्या प्रमाणात भाडे लावण्यात आलेले आहे ते स्थगीत करण्यात यावे. कमीत कमी भाडे आकारणी करण्यात यावी.**

**मा.सभापती : सदरील दुकान मार्केटमध्ये आतल्या साईडमध्ये आहे. 50 टक्के भाडे करण्यात यावे. विषय मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील भोलेश्वर मार्केट व्यापारी संकुल येथील दुकान क्र.20 भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.विष्णु कांतीलाल क्षिरसागर यांनी विनंती केल्यानुसार व सदर दुकान हे आतल्या साईडमध्ये असल्याने सदरील गाळयासाठी आकारण्यात आलेल्या भाडे दरात 50 टक्के कपात करून व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती नुसार प्रथम तीन वर्षाचे कालावधीकरीता दुकान भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 115 :**

**शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचे सिध्दार्थ उद्यानामध्ये दररोज 3 ते 4 हजार नागरीक उद्यानात येत असतात. सदर उद्यान हे औरंगाबाद शहरातील एक महत्वाचे पर्यटन स्थळ आहे. सद्यःस्थितीमध्ये सिध्दार्थ उद्यान प्रवेश फि तिकीट 3 ते 11 वयोगटातील बालकांकरीता रू.5/- व 11 वर्षाच्यापुढील सर्वांना रू.10/- व संगीत कारंजे प्रवेश फि तिकीट 3 ते 11 वयोगटातील बालकांकरीता रू.5/- व 11 वर्षाच्यापुढील सर्वांना रू.10/- तिकीट दर तसेच मिनी ट्रेन प्रवेश फि 3 ते 11 वयोगटातील बालकांकरीता रू.10/- आकारले जातात. सध्या उद्यान विभागाच्या कर्मचाऱ्यामार्फत तिकीट फि वसुली केली जाते. प्रवेश फि तिकीट वसुली करीता सकाळी 9 ते रात्री 8.30 पर्यंत बुकींगवर तीन चतुर्थ श्रेणी कर्मचारी व प्रवेशद्वाराजवळ दोन पाळीमध्ये चार चौकीदार तसेच मिनी ट्रेन व संगीत कारंजे येथे प्रत्येकी तीन असे सहा कर्मचारी लागतात.**

**उपरोक्तप्रमाणे एकुण तेरा कर्मचाऱ्यांच्या वार्षिक वेतनावर अपेक्षित रू.18 लक्ष एवढा खर्च येतो. याशिवाय प्रवेश फि तिकीट 2001 पासुन पावती बुकनुसार चालवण्यात येते प्रति दिवस सरासरी 30 ते 40 बुक लागतात. त्यानुसार एक वर्षाकरीता 11 ते 12 हजार पावती पुस्तके भांडार विभागातुन मागविण्यात येतात एक तिकीट बुकांची छपाई खर्च सहा रूपये इतका येतो. प्रतिवर्षी रू.72,000/- छपाईवर खर्च येतो.**

**दिनांक 16/08/2011 पासुन प्रवेश शुल्क लहान मुलांना रू.5/- व प्रौढांना रू.10/- प्रवेश फि लागु करण्यात आली व प्रवेश फि तिकीट खिडकीचे संगणकीकरण करण्यात आले. तसेच संगणकाच्या देखभाल दुरूस्ती व टोनरच्या रिफिलींगसाठी 1.5 लक्ष रूपये खर्च अपेक्षित येतो.**

**उपरोक्त प्रमाणे मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष उत्पन्न व चालु वर्षाचे एप्रिल 2012 ते ऑक्टोबर 2012 चे उत्पन्नाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| इ.सन | प्रवेश फि | संगीत कारंजे | मिनी ट्रेन | एकुण |
|---|---|---|---|---|
| २००९-२०१० | ३६,४४,४०० | १,६१,०६६ | १,७५,३२७ | ४०,००,९३६ |
| २०१०-२०११ | ४०,४२,२०० | १,४०,८०९ | १,७८,६०० | ४३,६१,६०९ |
| २०११-२०१२ ०१/०४/११ ते १५/०८/११ जुन्या दराप्रमाणे | १५,९३,००० | ६१,०२३ | ८४,७२८ | १७,३८,७५१ |
| २०११-२०१२ १६/०८/११ ते ३१/०३/१२ नव्या दराप्रमाणे | ७२,५३,४७५ | २,०७,७३० | ५,३२,००० | ७९,९३,२०५ |
| २०११-२०१२ | ८८,४६,४७५ | २,६८,७५३ | ६,१६,७२८ | ९७,३१,९५६ |
| २०१२-२०१३ ०१/०४/१२ ते ३१/१०/१२ | ६२,८४,०२५ | १,०३,६८० | ५,११,३५० | ६८,९९,०५५ |

उपरोक्त प्रमाणे नविन दराने वार्षिक उत्पन्न सरासरी रू. १ कोटी २३ लक्ष अपेक्षित आहे. त्यातुन वर दर्शविल्याप्रमाणे पगार व भत्त्याचा वार्षीक खर्च रू.१९.०५ लक्ष वजा केल्यास रू. १ कोटी ०३ लक्ष इतके निव्वळ उत्पन्न अपेक्षित आहे.

प्रवेश फि तिकीट वसुली खाजगी एजन्सीस दिल्यास बुकींगवरील व इतर कर्मचारी हे दुसऱ्या उद्यानात वापरल्या जाईल. त्यामुळे आस्थापनेवरील खर्च वाचेल. करिता प्रस्ताव सादर करण्यात येते की, वार्षीक उत्पन्न रू. १ कोटी ०३ लक्ष अपेक्षित धरून आधारभुत किमंतीवर प्रवेश फि तिकीट वसुली खाजगी एजन्सीला वार्षीक तत्वावर एक रक्कमी रक्कम भरणा करून देणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे सिध्दार्थ उद्यानामधील प्रवेश फि तिकीट वसुली, वार्षीक उत्पन्न रू. १ कोटी ०३ लक्ष अपेक्षित धरून या आधारभुत किमंतीवर खाजगी एजन्सीला वार्षीक तत्वावर एक रक्कमी रक्कम भरणा करून घेवून देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा. सभापती : श्री.मो.रा.थत्ते, मुख्य लेखापरीक्षक यांनी जा.क्र.मनपा/मुलेप/384/2012 दि.24/12/2012 रोजीच्या विनंती अर्जाद्वारे दिनांक 26.12.2012 ते 05.01.2013 या 11 दिवसांची अर्जित रजा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 57(3) अन्वये मंजुरीस्तव विहित नमुन्यात स्थायी समितीकडे सादर केलेली आहे. त्यानुसार वर उल्लेखीत दिनांकाची 11 दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात येते. त्यांच्या अनुपस्थितीच्या काळात श्री.अशोक थोरात, मुख्य लेखाधिकारी यांनी अतिरिक्त स्वरूपात मुख्य लेखापरीक्षक पदाचे कामकाज पाहण्यास देखील मंजुरी देण्यात येते.

याच बरोबर मा.सभापती यांनी सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**